# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

## दिनांकः11.04.2024 वारःगुरुवार

1.निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर मतदारांच्या तक्रार निवारणामध्ये महाराष्ट्र देशात तिसऱ्या स्थानी

2.देशात अशांतता, असहिष्णुता आणि विभाजनवादाची पेरणी करत असल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं विरोधकांवर टिकास्त्र

3.सहकारी संस्थांच्या निवडणूक निधीच्या हाताळणीसाठी 'ऑनलाईन निवडणूक निधी व्यवस्थापन प्रणाली'

4.रत्नागिरी जिल्हा साहित्य संमेलनात बदलत्या कोकणचा मागोवा आणि,

5.विदर्भात पुन्हा पाऊस आणि गारपीटीचा इशारा

**<u>तक्रार निवारण</u>**

निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर आलेल्या मतदारांच्या तक्रारींचं निवारण करण्यामध्ये महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर असल्याची माहिती आयोगाकडून देण्यात आली आहे. नागालँड पहिल्या आणि गुजरात दुसऱ्या क्रमांकावर आहे. राज्यात आतापर्यंत 14 हजार 753 तक्रारी दाखल झाल्या असून त्यापैकी 14 हजार 368 तक्रारींचं निवारण करण्यात आल्याची माहिती निवडणूक कार्यालयामार्फत देण्यात आली आहे. राज्यातल्या तक्रारींमध्ये पुणे जिल्ह्यातून सर्वाधिक म्हणजे दोन हजार 818, मुंबई उपनगरातून दोन हजार 331 आणि ठाण्यातून दोन हजार 183 तक्रारी आल्या आहेत. हिंगोली जिल्ह्यातून सर्वांत कमी म्हणजे 34 तक्रारी आलेल्या आहेत.

**<u>मोदी-प्रचार सभा</u>**

पंतप्रधान आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी देशात अशांतता, असहिष्णुता आणि विभाजनवादाची पेरणी करत असल्याबद्दल त्यांनी विरोधकांवर जोरदार टिका केली.नागपूरजवण रामटेक इथं प्रचार सभेत ते बोलत हे. श्रीराम 500 वर्षांनंतर अयोध्येत पोहोचले असून त्यांचा आशीर्वाद आपल्या पाठीशी असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. श्रीरामाच्या वास्तव्यानं रामटेक पुनित झालं असल्याचा उल्लेख मोदी यांनी केला. भाजपाचे नागपूरचे उमेदवार नितीन गडकरी यांनी यावेळी विदर्भातल्या सर्व जागा महायुती जिंकेल, असा विश्वास व्यक्त केला.

**<u>फडणवीस-गोयल</u>**

देशाची कमान पुन्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हातात जावी यासाठी मुंबईकरांनी महायुतीच्या पाठीशी ठामपणे उभं राहावं, असं आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत केलं. उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार पियुष गोयल यांच्या निवडणूक प्रचार कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

**<u>राष्ट्रवादी+कॉंग्रेस</u>**

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं सातारा मतदार संघात शशिकांत शिंदे तर रावेरमधे श्रीराम पाटील यांची उमेदवारी जाहीर केली. आतापर्यंत पक्षानं एकंदर नऊ उमेदवारांची नावं जाहीर केली असून, माढ्याचा उमेदवार अजून जाहीर व्हायचा आहे.

धुळे लोकसभा मतदारसंघात कॉंग्रेसच्या वतीनं डॉक्टर शोभा बच्छाव तर जालना जागेसाठी डॉक्टर कल्याण काळे यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

**<u>निवडणूक निधी व्यवस्थापन प्रणाली</u>**

राज्यातल्या सहकारी संस्थांच्या निवडणूक निधीच्या हाताळणीसाठी ‘ऑनलाईन निवडणूक निधी व्यवस्थापन प्रणाली’ संदर्भात भारतीय स्टेट बँक आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्यामध्ये नुकताच करार करण्यात आला. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणानं विकसित केलेल्या या प्रणालीचा उपयोग निधीची ऑनलाईन पद्धतीनं हाताळणी करण्यासाठी तसंच सर्व व्यवहारांमध्ये पारदर्शकता, गतिमानता, अचूकता आणण्यासाठी होणार आहे. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावर सहकारी गृहनिर्माण संस्था आणि राज्यातल्या सर्व सहकारी संस्था, कृषि उत्पन्न बाजार समिती यांच्या निवडणुका पार पाडण्याची जबाबदारी असते. त्यादृष्टीनं प्राधिकरणानं ही प्रणाली विकसित केली आहे.

**<u>वॉका-कोमसाप</u>**

कोकण मराठी साहित्य परिषदेचं तिसरं रत्नागिरी जिल्हा साहित्य संमेलन नुकतंच ज्येष्ठ साहित्यिक डॉक्टर अनुपमा उजगरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलं. मालगुंड इथं झालेल्या या संमेलनाचं उद्घाटन ज्येष्ठ कवी अशोक नायगावकर यांच्या हस्ते झालं. ग्रंथदिंडीने सुरू झालेल्या या संमेलनात विविध विषयांवरच्या परिसंवादांसह, कवितांच्या गावा जावे हा कार्यक्रमही झाला. शालेय विद्यार्थ्यांनी सादर केलेला कार्यक्रम हे संमेलनाचं वैशिष्ट्य ठरलं. याविषयी अधिक माहिती देत आहेत आमचे रत्नागिरीचे प्रतिनिधी...

**<u>व्हॉइस कास्ट स्क्रिप्ट</u>**

**'कोकणातल्या पाचही जिल्ह्यांच्या प्राथमिक शाळांचं मूल्यमापन करणारा अहवाल कोकण मराठी साहित्य परिषद लवकरच तयार करणार आहे,' अशी माहिती परिषदेचे मुख्य विश्वस्त रमेश कीर यांनी दिली. 'बदलतं कोकण' या विषयावरच्या परिसंवादात ते बोलत होते. या शाळांमधल्या सुविधा आणि त्या ठिकाणी जाणवणाऱ्या त्रुटी यांची बारकाईने नोंद करून तयार केलेला अहवाल सरकारला सादर करण्यात येणार आहे. तसंच तो माध्यमांद्वारे जाहीर करण्यात येणार आहे, असं त्यांनी सांगितलं. 'पत्रकारितेसह सर्वच क्षेत्रांना आगामी काळात कृत्रिम बुद्धिमत्तेचं मोठं आव्हान पेलावं लागणार आहे,' असं मत ज्येष्ठ पत्रकार सतीश कामत यांनी या वेळी व्यक्त केलं. कोकणाचा सांस्कृतिक ठेवा जपून ठेवण्यासाठी कलाकार आणि संस्थांना मूलभूत सुविधा मिळण्याची अपेक्षा ज्येष्ठ रंगकर्मी नितीन जोशी यांनी व्यक्त केली. मराठी शाळांमधल्या विद्यार्थ्यांचं घटत जाणारं प्रमाण ही धोकादायक बाब असल्याचं मत रत्नागिरीच्या भारत शिक्षण मंडळाचे पदाधिकारी विनायक हातखंबकर यांनी एका परिसंवादात व्यक्त केलं. आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी**

**<u>शक्ती</u>**

संगीत नाटक अकादमीच्या अध्यक्षा डॉक्टर संध्या पुरेचा यांच्या हस्ते आणि कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत शक्ति महोत्सवाचं उद्घाटन महालक्ष्मी अंबाबाई मंदिरात काल झालं. डॉ. सोमा घोष यांच्या हिंदुस्तानी संगीत गायनानं महोत्सवाची सुरुवात झाली. कोल्हापूरसह देशभरातील सात मंदिरांमध्ये हा महोत्सव होत आहे. भारतातील प्राचीन मंदिरांचं पावित्र्य राखलं जावं तसंच या मंदिरांच्या रुपानं अस्तित्वात असलेला मूर्त सांस्कृतिक ठेवा अधिक उजळून निघावा या उद्देशानं संगीत नाटक अकादमीनं मंदिर महोत्सवांची संकल्पना आणली आहे.

**<u>समता सप्ताह</u>**

स्त्री शिकली तर कुटुंब शिकतं. कुटुंबाचा विकास म्हणजे समाजाचा विकास होय, हे लक्षात ठेवून डॉक्टर पंजाबराव देशमुख यांनी संसदेत लढा दिला. सामाजिक मूल्यांसाठी ते संघर्षरत राहिले, असे गौरवोद्गार प्राचार्य डॉक्टर सुभाष गवई यांनी अमरावती इथं काढले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातल्या डॉक्टर आंबेडकर अभ्यास केंद्राच्या वतीनं समता सप्ताहानिमित्तानं आयोजित व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते.

**<u>चोक्कलिंगम -बैठक</u>**

अमरावती लोकसभा मतदारसंघातले मतदार राष्ट्रीय कर्तव्याच्या भावनेतून मतदानाचं प्रमाण वाढवून ते 75 टक्क्यांपर्यंत नेतील, असा विश्वास राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी काल अमरावती इथं व्यक्त केला. निवडणूक तयारीबाबत झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. मतदान केंद्रांचा त्यांनी आढावा घेतला तसंच मतदारांना देण्याच्या आरोग्यविषयक सुविधांबद्दल मार्गदर्शनही केलं.

एमसीएमसी -प्रशिक्षण लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी कार्यालयात काल माध्यम प्रमाणिकरण आणि संनियंत्रण समितीच प्रशिक्षण पार पडलं. राजकीय जाहिरातींचं पूर्व प्रमाणीकरण, मुद्रित माध्यमात येणाऱ्या जाहिराती आणि त्यासाठीच्या नियमावलीची काटेकोर अंमलबजावणी याबद्दल जिल्हा निवडणूक अधिकारी किशोर तावडे आणि मध्यवर्ती अधिकारी बैनाडे यांनी समिती सदस्यांना प्रशिक्षण दिलं.

**दिव्यांग-घरून मतदान**

चंद्रपूरच्या अतिदुर्गम भागातल्या महाराजगुडा गावातल्या एका दिव्यांग महिला मतदारासाठी निवडणूक अधिकारी यांनी गृह मतदानाची सोय उपलब्ध करून दिली. त्याचबरोबर नारपठार गावातल्या तीन वयोवृद्ध मतदारांनी गृह मतदानाचा लाभ घेऊन आपलं मत नोंदवलं.  निवडणूक आयोगानं यावर्षी प्रथमच 85 वर्षांवरील मतदार आणि 40 टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांगत्वाचं प्रमाणपत्र असलेल्या मतदारांसाठी गृह मतदानाची सोय उपलब्ध करून दिली आहे.

**प्रचार साहित्य**

लोकसभा निवडणूक काळात निवडणूक आयोगानं उमेदवारांना खर्चाचा प्रकार आणि त्याचे दर ठरवून दिले आहेत. प्रचार साहित्यासाठी करण्यात येणाऱ्या खर्चामध्ये  एकसूत्रता  राहावी यासाठी हे दर ठरवण्यात आले आहेत. अल्पोपहार, प्रवास, वाहन, प्रचार साहित्य, सभेसाठी होणारे खर्च यांचे दर ठरवून दिले असून निरीक्षक या खर्चावर नजर ठेवून आहेत.

**निरीक्षक**

सोलापूर लोकसभा निवडणुकीसाठी आयोगाकडून निरीक्षकांच्या नेमणूका करण्यात आल्या आहेत. यामध्ये पोलीस बंदोबस्तासाठी पोलीस अधिकारी दिशा मित्तल, सर्वसाधारण प्रक्रिया पार पाडण्यासाठी सनदी अधिकारी मिथिलेश मिश्रा, तर सनदी अधिकारी रूपाली ठाकूर या सोलापूर जिल्ह्यासाठी निरीक्षक म्हणून येणार आहेत.

**इद-उल-फित्र**

रमझानच्या पवित्र महिन्याचं समापन म्हणून इद-उल-फित्र आज साजरी करण्यात येत आहे. श्रद्धाळू, इदगाह आणि मशिदींमध्ये ईदच्या प्रार्थना यानिमित्तानं करतात. दिल्लीतील जामा, फतेहपुरी मशीद आणि शाही इदगाहमध्ये ईदनिमित्त सामूहिक प्रार्थनांचं आयोजन करण्यात आलं आहे. राष्ट्रपती, उप-राष्ट्रपती आणि पंतप्रधानांनी ईदनिमित्त लोकांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**अपघात**

लातूर जिल्ह्यातल्या उदगीर निलंगा राज्य महामार्गावर धनेगाव जवळ काल दुपारी ट्रक आणि कारची समोरासमोर धडक बसून झालेल्या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला. अपघातात मृत्युमुखी पडलेले कारमधील चौघेही जण इंदूर इथले रहिवासी होते.

**पाऊस**

हिंगोली जिल्ह्यात मंगळवारी झालेल्या गारपिटीनं जटाळवाडी इथं एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला तसंच काही जनावरंही मृत्यूमुखी पडली. वादळी वाऱ्यानं पत्रे उडाल्यामुळं चार जण जखमी झाले. पपई, करडई ,आंबे, संत्रा आणि कांद्याच्या बिया यांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं. घरं आणि महावितरणच्या खांबांचंही मोठं नुकसान झालं आहे.

अकोल्यात पडलेल्या पावसानं फळ पिकांचं नुकसान झालं. हवामान विभागानं दिलेल्या धोक्याच्या इशाऱ्यामुळं काही शेतकऱ्यांनी खबरदारी घेऊन नुकसान टाळलं.

**हवामान**

येत्या दोन दिवसात विदर्भात काही ठिकाणी जोरदार वादळी वाऱ्यांसह पावसाचा आणि गारा पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला असून दक्षता घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. मराठवाड्यातही तुरळक ठिकाणी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून उर्वरित राज्यात हवामान उष्ण आणि कोरडं राहील. राज्यात सर्वाधिक कमाल तापमान मालेगाव इथं 41 पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार